**प्रेसनोट दि. २१.०२.२०२३**

लोकसेवक श्री महेबुब नबिलाल बागवान, वय ४२ वर्ष, व्यवसाय – महसुल सहायक, तहसिल कार्यालय आटपाडी, रा. दत्त नगर, मज्जीद समोर आटपाडी, मुळ रा. मु.पो. लोहारा बुद्रुक इंदिरानगर, जि. उस्मानाबाद यांना ३,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगलीची कारवाई.

---

तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्ह्यांचे अनुषंगाने चॅप्टर केसची सुनावणी निवासी नायब तहसिलदार आटपाडी यांचे समक्ष सुरु आहे. सदर सुनावणीमध्ये वरीष्ठांना सांगुन चॅप्टर केसमध्ये पर्सनल बॉण्डवर सोडण्यासाठी व चॅप्टर केस निकाली काढण्यासाठी चॅप्टर केस टेबलचे काम पाहणारे महसुल सहायक श्री महेबुब नाबिलाल बागवान यांनी स्वतःकरीता ५,०००/- रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२०.०२.२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २०.०२.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री महेबुब नबिलाल बागवान, महसुल सहायक यांनी तक्रारदार यांना चॅप्टर केसमध्ये पर्सनल बॉण्डवर सोडण्यासाठी व चॅप्टर केस निकाली काढण्यासाठी ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ३०००/- रुपये दोन दिवसात आणुन देण्यास सांगीतल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.२१.०२.२०२३ रोजी लोकसेवक श्री. महेबुब नबिलाल बागवान, महसुल सहायक यांचे विरुद्ध तहसिलदार कार्यालय आटपाडीचे आवारात सापळा लावला असता, लोकसेवक श्री महेबुब नबिलाल बागवान, वय ४२ वर्ष, व्यवसाय - महसुल सहायक, तहसिल कार्यालय आटपाडी, रा. दत्त नगर, मज्जीद समोर आटपाडी, मुळ रा. मु.पो. लोहारा बुद्रुक इंदिरानगर, जि. उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ३०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री महेबुब नाबिलाल बागवान, महसुल सहायक यांचे विरुध्द आटपाडी पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्री सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली, श्री दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार धनंजय खाडे, प्रितम चौगुले, अजित पाटील, सीमा माने, सलीम मकानदार, राधीका माने ऋषीकेश बडणीकर, अतुल मोरे, सुदर्शन पाटील, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned with OKEN Scanner